MA. Marathi C-442

14P/230/4    Question Booklet No. 10

*(To be filled up by the candidate by blue/black ball-point pen)*

Roll No. | | | | | | | | | |

Roll No.
*(Write the digits in words)* ..................................................

Serial No. of OMR Answer Sheet ..................................

Day and Date ..................................    ..................................
(Signature of Invigilator)

## INSTRUCTIONS TO CANDIDATES

(Use only **blue/black ball-point pen** in the space above and on both sides of the Answer Sheet)

1. Within 10 minutes of the issue of the Question Booklet, check the Question Booklet to ensure that it contains all the pages in correct sequence and that no page/question is missing. In case of faulty Question Booklet bring it to the notice of the Superintendent/Invigilators immediately to obtain a fresh Question Booklet.
2. Do not bring any loose paper, written or blank, inside the Examination Hall *except the Admit Card without its envelope.*
3. A separate Answer Sheet is given. *It should not be folded or mutilated. A second Answer Sheet shall not be provided. Only the Answer Sheet will be evaluated.*
4. Write your *Roll Number and Serial Number of the Answer Sheet by pen* in the space provided above.
5. **On the front page of the Answer Sheet, write by pen your Roll Number in the space provided at the top, and by darkening the circles at the bottom. Also, wherever applicable, write the Question Booklet Number and the Set Number in appropriate places.**
6. No overwriting is allowed in the entries of Roll No., Question Booklet No. and Set No. (if any) on OMR sheet and also Roll No. and OMR Sheet No. on the Question Booklet.
7. Any change in the aforesaid entries is to be verified by the invigilator, otherwise it will be taken as unfair means.
8. Each question in this Booklet is followed by four alternative answers. *For each question, you are to record the correct option on the Answer Sheet by darkening the appropriate circle* in the corresponding row of the Answer Sheet, by ball-point pen as mentioned in the guidelines given on the first page of the Answer Sheet.
9. For each question, darken only one circle on the Answer Sheet. If you darken more than one circle or darken a circle partially, the answer will be treated as incorrect.
10. *Note that the answer once filled in ink cannot be changed.* If you *do not wish to attempt* a question, leave all the circles in the corresponding row blank (such question will be awarded zero mark).
11. For rough work, use the inner back page of the title cover and the blank page at the end of this Booklet.
12. Deposit *only the OMR Answer Sheet* at the end of the Test.
13. You are not permitted to leave the Examination Hall until the end of the Test.
14. If a candidate attempts to use any form of unfair means, he/she shall be liable to such punishment as the University may determine and impose on him/her.

[उपर्युक्त निर्देश हिन्दी में अन्तिम आवरण-पृष्ठ पर दिये गए हैं]    [No. of Printed Pages : 14

collegedunia
India's largest Student Review Platform

collegedunia.com
India's largest Student Review Platform

**No. of Questions : 150**

14P/230/4

**प्रश्नों की संख्या : 150**

*Time : 2 Hours ]* *[ Full Marks : 450*

*समय : 2 घण्टे ]* *[ पूर्णांक : 450*

***Note :*** (i) Attempt as many questions as you can. Each question carries **3 (three)** marks. ***One mark will be deducted for each incorrect answer.*** **Zero** mark will be awarded for each unattempted question.

अधिकाधिक प्रश्नों को हल करने का प्रयत्न करें। प्रत्येक प्रश्न **3 (तीन)** अंक का है। ***प्रत्येक गलत उत्तर के लिए एक अंक काटा जायेगा।*** प्रत्येक अनुत्तरित प्रश्न का प्राप्तांक शून्य होगा।

(ii) If more than one alternative answers seem to be approximate to the correct answer, choose the closest one.

यदि एकाधिक वैकल्पिक उत्तर सही उत्तर के निकट प्रतीत हों, तो निकटतम सही उत्तर दें।

collegedunia
India's largest Student Review Platform

collegedunia.com
India's largest Student Review Platform

१. 'कुसुमाग्रज' हे कोणत्या लेखकाचे टोपणनाव आहे

   १. श्री. व्यं केतकर          २. मा. म. देशमुख

   ३. वा. ल कुलकर्णी          ४. वि. वा शिरवाडकर

२. खालील पैकी कोणता अलंकाराचा प्रकार आहे.

   १. रस          २. ध्वनि

   ३. औचित्य          ४. उत्प्रेक्षा

३. आधुनिक काव्याचे जनक कोणास म्हटले जाते.

   १. गोविंदाग्रज          २. केशवसूत

   ३. केशवकुमार          ४. कुसुमाग्रज

४. खालीलपैकी कोणते नाटकाचे बलस्थान आहे

   १. संवाद          २. कथानक

   ३. पात्र          ४. लय

५. खालीलपैकी कोणता कथेचा घटक नाही.

   १. कथानक          २. पात्र

   ३. अलंकार          ४. निवेदन

६. *'कमीत कमी पात्रे आणि प्रसंग वापरून थोडया वेळात परिणामकारक रितीने सांगितलेली व ऐकणा—याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिगत म्हणजे ——*

   १. कथा होय.          २. कादंबरी होय.

   ३. चरित्र होय.          ४. नाटक होय.

७. खालीलपैकी कोणत्या कथाकारास नवकथाकार म्हणता येणार नाही.

   १. गंगाधर गाडगीळ          २. अरविंद गोखले

   ३. वि. स खांडेकर          ४. पु. भा. भावे

८. भाषा ही अर्जित वस्तू आहे. हे विधान

   १. असत्य आहे          २. सत्य आहे

   ३. कविकल्पना आहे          ४. अर्धसत्य आहे

९. संज्ञापन हे भाषेचे ..........

   १. मुख्य कार्य आहे.          २. भाषेचे दुय्यम कार्य आहे

   ३. कार्य नाही.          ४. व्याकरण होय.

१०. मानसिक व शारीरिक क्रियांच्या संयोगातून. .....

   १. अलंकार सिध्द होतात          २. रस सिध्द होतात

   ३. काव्य सिध्द होते          ४. भाषा सिध्द होते

११. खालीलपैकी कोणते संज्ञापनाचे साधन आहे.........

   १. फळ          २. चित्र

   ३. पुस्तक          ४. वही

collegedunia
India's largest Student Review Platform

१२. भाषा ही कशावर आधालेली असते.

१. संकेतावर
२. पुस्तकावर
३. मुळाक्षरांवर
४. शिक्षकावर

१३. खालीलपैकी कोणाला समीक्षक म्हणता येणार नाही.

१. वा. ल कुलकर्णी
२. रा. श्री. जोग
३. राम गणेश गडकरी
४. श्री. के क्षीरसागर

१४. श्री. व्यं केतकरांना-----

१. कवी म्हणून ओळखले जाते.
२. ज्ञानकोशकार म्हणून ओळखले जाते.
३. कथाकार म्हणून ओळखले जाते.
४. चरित्रकार म्हणून ओळखले जाते.

१५. 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत.

१. श्री. व्यं केतकर
२. द के केळकर
३. वामनपंडीत
४. दि. के बेडेकर

१६. अलंकाराकडे आज जुनाट शास्त्र म्हणून बघितले जाते कारण....

१. त्याचा कृत्रिमतेवर अधिक भर असतो.
२. ते जुनं शास्त्र आहे.
३. संस्कृतचा प्रभाव कमी झाला आहे.
४. अभ्यासूवृत्ती कमी झाली आहे.

१७. भारतीय साहित्यशास्त्राचा विचार............

१. अलंकाराच्या आधारे सुरू झाला.
२. नाट्यशास्त्राच्या आधारे सुरू झाला.
३. औचित्याच्या आधारे सुरू झाला.
४. ध्वनिशास्त्राच्या आधारे सुरू झाला.

१८. कोणत्या अर्थाला कवितेत अधीक महत्व दिले जाते.

१. संकेतार्थ
२. अभिद्या
३. लक्षणा
४ व्यंजना

१९. खालील गटात न बसणारा वाङ्मयप्रकार कोणता?

१. कविता
२. ललितगद्य
३. कादंबरी
४. कथा

२०. कृष्णाजी केशव दामले म्हणजे

१. केशवकुमार
२. केशवसुत
३. कुसुमाग्रज
४. गोविंदाग्रज

२१. 'केशवकुमार' म्हणजे.........

१. रा. ग. गडकरी
२. प्र. के अत्रे
३. कृ. के. दामले
४. वि. वा शिरवाडकर

२२. खालीलपैकी कशाचा भाषेच्या संरचनेशी संबंध नसतो.........................

१. ध्वन
२. रूपिका
३. रस
४. वाक्य

२३. ' विशेषत्वाने स्पष्ट करणे' म्हणजे....................

१. व्याकरण
२ वाक्य
३. रूप
४. ध्वनिंची सुसंगत रचना करणे.

२४. भाषाविज्ञान म्हणजे ..........

१. साहित्यशास्त्र.
२. विज्ञानातील भाषा
३. भाषेचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा
४. बोलीभाषा



collegedunia
India's largest Student Review Platform

२५. वर्णनात्मक भाषा अभ्यास पध्दती ही ......

१. पायाभूत अभ्यासपध्दती आहे. २. फारशी महत्त्वाची मानली जात नाही.

३. दुय्यम अभ्यासपध्दती आहे. ४. अभ्यासयोग्य पध्दती नाही.

२६. 'सर्व अलंकार म्हणजे उपमेचा विस्तार आहे' असे कोणी म्हटले आहे

१. वामन २. भामह

३. आनंदवर्धन ४. दण्डी

२७. 'कुणी उधळली मूठ नभी ही लाल गुलालाची' या ओळी कोणत्या कवीच्या आहेत.

१. बालकवी २. कुसुमाग्रज

३. भा. रा. तांबे ४. मोरोपंत

२८. शांतरसाची रसविचारात कोणी भर घातली आहे.

१. दण्डी २. भामह

३. ज्ञानेश्वर ४. नामदेव

२९. वि. दा सावरकर यांच्या खंडकाव्याचे नाव सांगा?

१. विरहतरंग २. विशाखा

३. कुवलयमाला ४. कमला

३०. ज्या स्वरांच्या स्वरूपाबाबत निश्चिती असते(मतभेद नसतात)त्या स्वरांना....

१. मानस्वर म्हणतात २. अर्धस्वर म्हणतात

३. मध्यस्वर म्हणतात ४. संयुक्तस्वर म्हणतात

३१. भाषा ही एक .......... संस्था आहे

१. राजकीय २. कौटुंबिक

३. सामाजिक ४. ऐतिहासिक

३२ 'बहुरूपिणी' असे कोणत्या वाङ्मयप्रकाराचे वर्णन करता येईल.

१. कथा २. कादंबरी

३. दीर्घकथा ४. कविता

३३. महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानास ........

१. अद्वैत तत्त्वज्ञान म्हणतात. २. फसवे तत्त्वज्ञान म्हणतात.

३. द्वैत तत्त्वज्ञान म्हणतात. ४. भक्तीमय तत्त्वज्ञान म्हणतात.

३४ 'आहे हे असे आहे' कथासंग्रहाच्या लेखिका.......

१. कमल देसाई २ मालतीबाई बेडेकर

३. कुसुमावती देशपांडे ४ गौरी देशपांडे

३५ मानवी मूल जीववैज्ञानिकदृष्ट्या कोणत्या वयात भाषा शिकण्याच्या तयारीमध्ये असते

१. १ ते ३० महिन्यांपर्यंत २. १२ ते ३६ महिन्यांपर्यंत

३. १८ ते ४८ महिन्यांपर्यंत ४. ६ ते ४० महिन्यांपर्यंत

३६ 'बोलता येणे हे जीवनास उपयुक्त आहे पण आवश्यक नाही' हे विधान...........

१. बरोबर आहे. २. फसवे आहे

३. चूक आहे. ४ काल्पनिक आहे

३७. केवळ उच्चारणाने काम करणारा एकच एक अवयव प्रत्येकाच्या शरीरात असतो. तो म्हणजे

१. जीभ २ दात

३. स्वरतंत्री किंवा कंठमणी ४. ओठ

३८. खालीलपैकी कोणता काव्यप्रकार नाही.

१. अभंग
२. ओवी
३. साकी
४. बखर

३९. 'अमृतानुभव' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

१. श्रीधर
२. वामन पंडीत
३. ज्ञानेश्वर
४. अमृतराय

४०. साहित्यशास्त्रात वक्रोक्तीचा विचार प्रथम कोणी मांडला.

१. भामह
२. भरतमुनी
३. आनंदवर्धन
४. मोरोपंत

४१. कोणत्या भाषेपासून कोणती भाषा जन्मास आली आहे, हे शोधण्यासाठी कोणत्या भाषाभ्यासपध्दतीची मदत घेता येईल!

१. ऐतिहासिक
२. संरचनात्मक
३. वर्णनात्मक
४. तौलनिक

४२. मुकुंदराजांना मराठीतील.........

१. भक्तकवी आहेत.
२. शाहीर कवी आहेत.
३. आद्यकवी आहेत.
४. बखरकार आहेत.

४३. आर्यापती म्हणून कोणत्या पंडीत कवीस ओळखले जाते.

१. मोरोपंत
२. निरंजन माधव
३. वामनपंडीत
४. दासोपंत

४४. लीळाचरीत्र हा मराठीतील पहिला....

१. चरित्रग्रंथ होय.
२. टीकाग्रंथ होय.
३. काव्यग्रंथ होय.
४. खंडकाव्य होय.

४५. शके १२१२ ला कोणता प्रसिध्द टीकाग्रंथ निर्माण झाला आहे.

१. एकनाथी भागवत
२. ज्ञानेश्वरी
३. विवेकसिंधून
४. लीळाचरित्र

४६. मुखावाटे उच्चाराला जाणे व भाषेत वापरला जाणे ही कशाची लक्षणे आहेत.

१. रूपिमची
२. स्वनाची
३. रूपिकांची
४. व्यंजनाची

४७. पोत, ऊर्जायन, गतिमानी या ग्रंथाचे लेखक कोण आहेत.

१. ब. सी. मर्ढेकर
२. शरदचंद्र मुक्तीबोध
३. रा. भा. पाटणकर
४. द. ग. गोडसे

४८. परमेश्वराला आपला पती मानून भक्त स्वतःकडे त्याच्या पत्नीची वा प्रेयसीची भूमिका घेतो त्या भक्तीला काय म्हणतात.

१. पादसेवनभक्ती
२. अर्चनभक्ती
३. आत्मनिवेदनभक्ती
४. मधुराभक्ती

४९. 'तत्व सालंकारस्य काव्यता' हे उद्‌गार कोणी काढले आहेत.

१. वामन
२. दण्डी
३. कुंतक
४. आनंदवर्धन

५०. खालीलपैकी कोणता वक्रोक्तीचा प्रकार आहे?

१. वर्णविन्यासवक्रता
२. औचित्यवक्रता
३. अलंकारवक्रता
४. रसवक्रता

collegedunia.com
India's largest Student Review Platform

५१. खालीलपैकी कोणती शब्दशक्ती नाही.

१. अभिधा
२. अनुप्रास
३. लक्षणा
४. व्यंजना

५२. विस्तृत आणि व्यापक चित्रफलक असलेला वाङ्मय प्रकार म्हणजे .....

१. कादंबरी
२. कथा
३. कविता
४. नाटक

५३. सतराव्या शतकातील मराठीवर सर्वात जास्त कोणत्या भाषेचा प्रभाव होता.

१. तमिळ
२. फार्सी
३. संस्कृत
४. कानडी

५४. निबंधमालाकार म्हणून कोणास ओळखले जाते.

१. विष्णूशास्त्री चिपळूणकर
२. ह. ना. आपटे
३. वि. का. राजवाडे
४. ना. म. भिडे

५५. दुस—याच्या जीवनाबद्दल लिहिणे म्हणजे.......

१. चरित्र
२. आत्मचरित्र
३. कथा
४. कादंबरी

५६. आस्वादक ही.............

१. समीक्षापध्दती आहे.
२. कथनपध्दती आहे
३. निवेदनपध्दती आहे
४. परीक्षापध्दती आहे.

५७. कुंतकाने वक्रोक्तीचे किती प्रकार मानले आहेत.

१. एक
२. सहा
३. तिन
४. पाच

५८. मराठी वाङ्मयावर खालीलपैकी कोणत्या विचारधारेचा अधिक प्रभाव आहे.

१. औचित्य
२. रस
३. अलंकार
४. वक्रोक्ती

५९. आनंदवर्धनाच्या 'ध्वन्यालोक' ग्रंथावर 'लोचन' नावाची टीका कोणी लिहिली आहे.

१. भरतमुनी
२. अभिनवगुप्त
३. दण्डी
४. भामह

६०. अभिधा, लक्षणा व व्यंजना ........... आहेत

१. शब्दशक्ती
२. अलंकार
३. व्यभिचारीभाव
४. रसविघ्ने

६१. महात्मा पंथ, अच्युतपंथ, जयकृष्णी पंथ, भट्टमार्ग, परमार्ग ही सर्व कोणत्या पंथाची नावे आहेत

१. महानुभाव
२. वारकरी
३. नाथ
४. दत्त

६२. गण, गवळण, लावणी, बतावणी, वग ही कशाची प्रमुख अंगे आहेत.

१. फार्सची
२. नाटकाची
३. संगीत नाटकाची
४. तमाशाची

६३. 'स्वन' निर्मितीसाठी खालीलपैकी कोणत्या अवयवाची मदत होते.

१. हात
२. कान
३. डोळा
४. जीभ



collegedunia.com
India's largest Student Review Platform

६४. स्वराच्या मदतीशिवाय कोणाच्या उच्चारण होवू शकत नाही.
१. व्यंजन
२. स्वर
३. संयुक्त स्वर
४. अर्धस्वर

६५. आधुनिक भाषाविज्ञानाचा पाया कोणी घातला...
१. सोस्यूरने
२. ग्रिअर्सन
३. ब्लूमफिल्ड
४. चॉम्स्की

६६. कोणत्याही भाषेत व्यंजनांपेक्षा स्वरांची संख्या......
१. पुष्कळ अधीक असते
२. पुष्कळ कमी असते
३. सारखीच असते.
४. थोडी कमी असते.

६७. अल्पतमयुग्मांच्या जोडया शोधणे हे .........
१. सदृश्ययुग्माच्या जोडयांसाठी फायदयाचे आहे.
२. काटकसरीसाठी आवश्यक आहे.
३. वास्तवता लपविण्यासाठी आवश्यक आहे.
४. स्वनिमनिश्चितीचे सर्वात महत्वाचे तत्त्व आहे.

६८. अॅ ऑ हे मराठीतील.....
१. नवी व्यंजने आहेत.
२. जुने स्वर आहेत.
३. अर्धस्वर आहेत.
४. नवे स्वर होत.

६९. अर्थ कशावर आधारलेला असतो......
१. संकेतावर
२. शब्दावर
३. व्याकरणावर
४. वाक्यावर

७०. अर्थविचाराला भाषेचे........ म्हणतात.
१. जीवन
२. शास्त्र
३. मानसशास्त्र
४. रूप

७१. कोणती व्यंजने अर्धस्वर म्हणून कार्य करतात.
१. य, प
२. य, व
३. व, म
४ व, ब

७२. चित्राला...........
१. सर्व जगाची भाषा म्हणतात.
२. बोली भाषा म्हणतात.
३. हृदयाची भाषा म्हणतात.
४. इतिहासाची भाषा म्हणतात.

७३. पुढीलपैकी कोणत्या भाषेचा मराठीवर अधिक प्रभाव नाही?
१. संस्कृत
२. कानडी
३. अपभ्रंश
४. इंग्रजी

७४. मराठीतील वैद्य – गुणे वाद........... सबंधी गाजलेला आहे.
१. मराठीच्या उत्पत्तीसंबंधी
२. साहित्यप्रयोजना
३. कलेसाठी कला या
४. जीवनासाठी कला या

७५. खालीलपैकी कोणते कवी हे रविकिरण मंडळातील नाहीत?
१. माधव ज्युलियन
२. बा. भ. बोरकर
३. यशवंत
४. गिरीश

७६. 'ह' हे ......... व्यंजन आहे.
१. महाप्राण
२. अल्पप्राण
३. अर्धस्वर
४. संयुक्त

collegedunia
India's largest Student Review Platform

७७ 'रात्रंदिवस मन रंगलें। हरिचरणी चित्त जडलें।
विरहाचें दुःख फिटलें। धन्य झालें संसारी। ही विराणी कोणत्या संतकवीची आहे

१. एकनाथ
२. नामदेव
३. सावतामाळी
४. तुकाराम

७८. वामनाच्या 'रिती' ला 'संघटना' असे कोणी म्हटले आहे?

१. वि. का राजवाडे
२. दण्डी
३. म. वा धोंड
४. आनंदवर्धन

७९. यशवंतराव चव्हाणांच्या आत्मचरित्राचे नाव.......

१. क--हेचे पाणी
२. नराळ अंतराळ
३. एका मुंगीचे महाभारत
४. कृष्णाकाठ

८०. रीतीला काव्याचे प्राणतत्त्व कोणी मानले आहे.

१. आनंदवर्धन
२. दण्डी
३. दाम्पोपन
४. वामन

८१. मराठीतील लघुनिबंधाचे जनक कोणास म्हटले जाते?

१. ग. श्री जोग
२. ना. सी. फडके
३. आनंद यादव
४. वि. स. खांडेकर

८२. तेराव्या शतकातील मराठीला कोणते नाव देता येईल!

१. यादवकालीन मराठी
२. आधुनिक मराठी
३. पेशवेकालीन मराठी
४. शिवकालीन मराठी

८३ पेशवेकाळात कोणत्या काव्यप्रकारास अधिक भरभराट आलेली दिसते

१. पोवाडा
२. लावणी
३. श्लोक
४. अभंग

८४ यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण ही कशाची प्रयोजने मानली जातात

१. लोककलांची
२. अलंकारांची
३. भाषेची
४. साहित्याची

८५. भरतमुनींच्या प्रसिद्ध ग्रंथाचे नाव.....

१. काव्यशास्त्र
२. रसविचार
३. अभिनवभारती
४. नाट्यशास्त्र

८६. भारती, कैशिकी, सात्त्वती व आरभटी या चार वृत्ती कोणी सांगितलेल्या आहेत?

१. भरतमुनी
२. मंगेपत
३. भामह
४. जगन्नाथपंडीत

८७ 'बटाटा' हा शब्द मूळ कोणत्या भाषेतील आहे

१. पोर्तुगीज
२. फार्सी
३. कानडी
४. इंग्रजी

८८ भरताच्या नाट्यशास्त्रावरील एकमेव टीकाग्रंथ म्हणजे.......

१. नाट्यभारती
२. अभिनवभारती
३. नाट्यविमर्श
४. टीकाविवेक

collegedunia
India's largest Student Review Platform

८९. शाब्दी आणि आर्थी हे कशाचे प्रकार आहेत.

१. अभिधा २. व्यंजना

३. आज्ञार्थ ४. लक्षणा

९०. अर्ज, जमीन हे शब्द मूळ कोणत्या भाषेतील आहेत.

१. पोर्तुगीज २. फार्सी

३. कानडी ४. इंग्रजी

९१. रसाचा विचार प्रथम भरतमुनींनी आपल्या.........

१. नाटयशास्त्रात मांडला २. काव्यप्रदीपमध्ये मांडला

३. ध्वन्यालोक मध्ये मांडला ४. अभिनव भारतीत मांडला

९२. खालीलपैकी कोणाला रूपवादी समीक्षक म्हणता येईल.

१. माधव आचवल, सुधीर रसाळ २. वा.ल. कुलकर्णी, द. भि. कुलकर्णी

३. रा. भा. पाटणकर, के. ना वाटवे ४. दि. के बेडेकर, रा. श्री. जोग

९३. क्षेमेंद्र यांनी काव्याचा आत्मा कशास मानले आहे.

१. रितीविचारास २. रसविचारास

३. अलंकारविचारास ४. औचित्यास

९४. 'नटसम्राट' नाटकाचे लेखक........

१. वि. वा शिरवाडकर २. मामा वरेरकर

३. राम गणेश गडकरी ४. प्र. के अत्रे

९५. खालीलपैकी कोणती चरित्रात्मक कादंबरी आहे.

१. रणांगण २. सावित्री

३. अमृतवेल ४. झोंबी

९६. कोणत्या नाटकावर इंग्रज सरकारने बंदी घातली होती.

१. कीचकवध २. सौभद्र

३. सीतास्वयंवर ४. भाऊबंदकी

९७. जिवंतपणा, लवचिकता हे विशेष कोणत्या भाषेत आढळतात

१. प्रमाणभाषेत २. बोली भाषेत

३. प्रमाण भाषा आणि बोलीभाषेत. ४. प्रमाणभाषा व बोलीभाषा दोन्हीतही नाही.

९८. विठा रेणूकानंदन , जनी जनार्दन, रामा जनार्दन, दासोपंत यांना........

१. एकनाथांसह एकनाथ पंचक म्हणून ओळखतात.

२. नामदेवांसह नामदेव पंचक म्हणून ओळखतात.

३. तुकारामांसह तुकाराम पंचक म्हणून ओळखतात.

४. रामदासांसह रामदास पंचक म्हणून ओळखतात.

९९. महाराष्ट्रातील १६८ संतांची चरित्रे लिहून चरित्र वाङ्मयाचे भांडार कोणी समृध्द केले आहे

१. गिरीधर २. अमृतराय

३. महिपतीबोवा ताहराबादकर ४. दासो दिगंबर

१००. 'भारताची भाषिक पाहणी' (Linguistic Survey of India) हा प्रकल्प कोणत्या ब्रिटीश मुलकी अधिका—याने हाती घेतला होता.

१. जॉर्ज ग्रिअर्सन २. विल्यम जोन्स

३. चॉम्स्की ४. लॉर्ड कर्झन

collegedunia
India's largest Student Review Platform

१०१. खालीलपैकी कोणती मराठीची बोली नाही.....

१. कोकणी | २. मल्याळम्
३. व–हाडी | ४. अहिराणी

१०२. 'निबंधसम्राट' म्हणून कोणास ओळखले जाते.

१. वि. दा. सावरकर | २. लोकहितवादी
३. शि. म. परांजपे | ४. न. चिं. केळकर

१०३. कोणाचे अभंग शीखांच्या ग्रंथसाहेब या ग्रंथात समाविष्ट झालेले आहेत.

१. तुकाराम | २. नामदेव
३. एकनाथ | ४. ज्ञानेश्वर

१०४. 'वाचे बरवे कवित्व। कवित्वी बरवे रसिकत्व।
रसिकत्वी हि परतत्व। स्पर्शू जैसा॥ हे उद्गार कोणाचे आहेत

१. संत ज्ञानेश्वर | २. संत नामदेव
३. संत एकनाथ | ४. संत तुकाराम

१०५. संतकृपा झाली इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचला पाया। उभारिले देवालया।
नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार।
जनार्दनी एकनाथ। खांब दिला भागवत।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।' अशा प्रकारे संतांच्या कार्याचे वर्णन कोणी केले आहे.

१. जनाबाई | २. बहिणाबाई
३. मुक्ताबाई | ४. कान्होपात्रा

१०६. 'माझे विद्यापीठ' या कवितासंग्रहाचे कवी.....

१. माधव ज्यूलियन | २. नारायण सुर्वे
३. वसंत बापट | ४. भा. रा. तांबे

१०७. 'शिलालेख' म्हणजे ....

१. दगडावर कोरून लिहिलेले | २. पत्र्यावर कोरून लिहिलेले
३. भिंतीवर कोरून लिहिलेले | ४. कागदावर लिहिलेले

१०८. 'भूपाळी' हा...........

१. काव्याचा प्रकार आहे | २. अलंकाराचा प्रकार आहे
३. रीतीचा प्रकार आहे. | ४. रसाचा प्रकार आहे

१०९. खालीलपैकी कोणते भाषेचे प्रमुख अंग नाही?

१. ध्वनिविचार | २. अर्थविचार
३. व्याकरण | ४. लिपी.

११०. अंतर्वर्तुळ — बहिर्वर्तुळ सिद्धांत कोणत्या भाषाशास्त्रज्ञाने विशद केला आहे

१. हॉर्न्ले | २. ना. गो. कालेलकर
३. जॉर्ज ग्रिअर्सन | ४. सुनीतिकुमार चटर्जी

१११. मराठीत लिंगाचे किती प्रकार मानले जातात.

१. ०१ | २. ०३
३. ०२ | ४. ०४

११२. खालीलपैकी कोणता महानुभावकालीन विवाहगीतांचा प्रकार आहे

१. धवळे | २. मालगीत
३. ओवीगीत | ४. वरगीत

११३. 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचे लेखक ....

१. प्र. के अत्रे — २. कृ. प्र. खाडीलकर

३. सतीश आळेकर — ४. वसंत कानेटकर

११४. दया पवारांच्या आत्मकथनाचे नाव........

१. उचल्या — २. उपरा

३. बलुतं — ४. कोल्हाट्याचं पोरं

११५. 'दशपदी' हा कशाचा प्रकार आहे.

१. अलंकाराचा — २. कवितेचा

३. रितीचा — ४. नाटकाचा

११६. 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्राच्या लेखिका............

१. लक्ष्मीबाई टीळक — २. रमाबाई रानडे

३. लीलाबाई पटवर्धन — ४. माधवी देसाई

११७. 'तराळ अंतराळ' या आत्मकथनाचे लेखक..................

१. उत्तम बंडू तुपे — २. शंकरराव खरात

३. दया पवार — ४. दादासाहेब मोरे

११८. सुरूवातीला लघुनिबंधाला गुजगोष्टी असे कोणी संबोधिले आहे.

१. वि. स. खांडेकर — २. कुसुमावती देशपांडे

३. ना. सी. फडके — ४. आनंद यादव

११९. नाटयप्रयोगाला आधारभूत असणारे लिखित स्वरूपातील शब्दरूप नाटक म्हणजे...

१. नाटयसंहिता होय — २. नाटयछटा होय

३. कथानाटय होय — ४. नाटयधारा होय

१२०. उद्देश आणि विधेय हे कशाचे घटक आहेत?

१. वाक्याचे — २. रूपिमचे

३. अर्थाचे — ४. स्वनिमचे

१२१. होनाजी बाळा यांची प्रसिध्द रचना म्हणजे....

१. लटपट लटपट तुझं चालणं... — २. बिकट वाट वहिवाट.....

३. हेचि दान दे गा देवा.... — ४. घनःश्याम सुंदरा ...

१२२. क्षेमेंद्राने किती काव्यांगे (मर्मस्थाने) सांगितली आहेत.

१. सत्तावीस — २. सात

३. सतरा — ४. पाच

१२३. अभिनवगुप्ताने किती रसविघ्ने सांगितलेली आहेत?

१. सत्तावीस — २. तिन

३. पाच — ४. सात

१२४. नाम, सर्वनाम, विशेषण या काय आहेत?

१. शब्दांच्या जाती — २. अर्थाचे प्रकार

३. वाक्याचे प्रकार — ४. स्वनिमाचे प्रकार

१२५. वारकरी संप्रदायातील कोणत्या कवीला कळसाची उपमा दिली जाते......

१. निळोबा पिंपळनेरकर — २. तुकाराम

३. सावता माळी — ४. चोखामेळा



collegedunia
India's largest Student Review Platform

१२६. ''जैसें बिंब तरी बचकेंएवढें। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें।
शब्दाची व्याप्ती तेणें पाडें। अनुभवावी।'' अशा प्रकारे शब्दाची व्याप्ती कोणी स्पष्ट केली आहे.

१. ज्ञानेश्वर २. तुकाराम
३. फादर थॉमस स्टीफन्स ४. फादर क्रुवा

१२७. नाटक या वाङ्मयप्रकाराला .............. मानावा लागेल.

१. नाट्यप्रकार २. कलाप्रकार
३. अभिनयप्रकार ४. सादरीकरणाचा कलाप्रकार

१२८. कोणत्या शाहीराचा 'फटका' अतिशय प्रसिध्द आहे.

१. अनंत फंदी २. राम जोशी
३. सगनभाऊ ४. होनाजी बाळ

१२९. आकाशवाणीवरून सादर होणा—या नाटकास......... म्हणतात.

१. पथनाट्य २. एकांकिका
३. नभोनाट्य ४. नाटीका

१३०. नाटकाच्या दृष्टीने वाङ्मय व प्रयोग हे दोन्हीही दृष्टीकोण ...........

१. परस्परपूरक आहेत २. परस्परविरोधी आहेत
३. फक्त वाङ्मय महत्वाचे ४. फक्त प्रयोग महत्वाचा

१३१. नाटकाचा आत्मा कशास म्हणतात?

१. नाटकातील संघर्षास २. नाटकातील संवादास
३. नाटकातील पात्रांस ४. नाटकातील कथानकास

१३२. खालीलपैकी कोणता नाटकाचा प्रकार नाही?

१. प्रहसन २. सुखात्मिका
३. शोकात्मिका ४. संविधानक

१३३. कोणती बखर मराठीतील पहिली बखर मानली जाते?

१. महिकावतीची बखर २. सभासदाची बखर
३. अंताजीची बखर ४. भाऊसाहेबांची बखर

१३४. तंजावरचे राजे सरफोजी यांनी मुलांसाठी कोणते पहिले मराठी पुस्तक प्रकाशित केले

१. एकशे दहा इसापनीतिकथा २. बिरबल–बादशहाच्या कथा
३. इसापनीतिकथा ४. नीतिकथा

१३५. बालकवी म्हणजेच.........

१. त्र्यंबक बापूजी ठोमरे २. राम गणेश गडकरी
३. वा. ना. देशपांडे ४. न. श्री. जोग

१३६. दात, ओठ, जीभ ही.....

१. वागिन्द्रिय आहेत २. वागिन्द्रिय नाहीत.
३. भाषेपासून दूर राहणारी आहेत. ४. यापैकी एकही नाही

१३७. प्, फ्, ब्, भ् हे स्वन.......... आहेत.

१. दन्त्य २. मूर्धन्य
३. तालव्य ४. ओष्ठ्य

१३८. 'झेंडूची फुले' या विडंबन संग्रहाचे कवी..... ... आहेत.

१. प्र. के. अत्रे २. पु. ल. देशपांडे
३. अनंत काणेकर ४. म. ना. अदवंत



collegedunia.com India's largest Student Review Platform

१३९. 'हायकू' हा जपानी काव्यप्रकार मराठीत प्रथम कोणी आणला?
१. शिरीष पै
२. माधव ज्युलियन
३. गिरीश
४. बा. भ बोरकर
१४०. 'छावा' या कादबरीचे लेखक.....
१. शिवाजी सावंत
२. रणजित देसाई
३. माधवराव पटवर्धन
४. वि. स खांडेकर
१४१. खालीलपैकी कोणत्या लेखकास ज्ञानपीठ पुरस्कार लाभलेला नाही.
१. वि. स. खांडेकर
२. विश्राम बेडेकर
३. वि. वा. शिरवाडकर
४. विंदा करंदरीकर
१४२. व्यंकटेश माडगूळकरांचा प्रसिध्द कथासंग्रह कोणता?
१. माणदेशी माणसं
२. बनगरवाडी
३. उपेक्षितांचे अंतरंग
४. पारवा
१४३. 'आहे हे असं आहे' या कथासंग्रहाच्या कथालेखिका ............
१. आनंदीबाई शिर्के
२. कुसुमावती देशपांडे
३. गौरी देशपांडे
४. कमल देसाई
१४४. 'गुरूचरित्र' हा कोणत्या संप्रदायाचा मुख्य ग्रंथ आहे.
१. दत्तसंप्रदाय
२. वारकरी संप्रदाय
३. नाथ संप्रदाय
४. महानुभाव संप्रदाय
१४५. खालीलपैकी कोणता स्थायीभाव आहे.
१. शोक
२. लज्जा
३. हर्ष
४. ग्लानी
१४६. 'नामसंकीर्तन साधन पै सांगे। जळतील पापे जन्मातरीची।
न लगती सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण। ही प्रसिध्द रचना कोणाची आहे?
१. संत तुकाराम
२. संत नामदेव
३. संत बहिणाबाई
४. संत जनाबाई
१४७. 'श्रीमान योगी' या प्रसिध्द ऐतिहासिक कादंबरीचे लेखक.......
१. रणजित देसाई
२. न. चिं केळकर
३. शिवाजी सावंत
४. ना. स इनामदार
१४८. स्वेद, रोमांच, अश्रू याना कोणते भाव म्हणता येईल?
१. विभिन्नभाव
२. स्थायिभाव
३. व्यभिचारीभाव
४. सात्त्विकभाव
१४९. 'बरें सत्य बोला, यथातथ्य चाला। बहु मानति लोक, येणें तुम्हाला। हा उपदेश कोणाचा आहे.
१. तुकाराम
२. एकनाथ
३. ज्ञानेश्वर
४. रामदास
१५०. 'परिपूर्ती' या ललितगद्याच्या लेखिका.. ...
१. कमल देसाई
२. इरावती कर्वे
३. गौरी देशपांडे
४. कुसुमावती देशपांडे

---



collegedunia
India's largest Student Review Platform

collegedunia.com
India's largest Student Review Platform

# अभ्यर्थियों के लिए निर्देश

(इस पुस्तिका के प्रथम आवरण पृष्ठ पर तथा उत्तर-पत्र के दोनों पृष्ठों पर केवल ***नीली/काली बाल-प्वाइंट पेन*** से ही लिखें)

1. प्रश्न पुस्तिका मिलने के 10 मिनट के अन्दर ही देख लें कि प्रश्नपत्र में सभी पृष्ठ मौजूद हैं और कोई प्रश्न छूटा नहीं है। पुस्तिका दोषयुक्त पाये जाने पर इसकी सूचना तत्काल कक्ष निरीक्षक को देकर सम्पूर्ण प्रश्नपत्र की दूसरी पुस्तिका प्राप्त कर लें।
2. परीक्षा भवन में ***लिफाफा रहित प्रवेश-पत्र के अतिरिक्त***, लिखा या सादा कोई भी खुला कागज साथ में न लायें।
3. उत्तर-पत्र अलग से दिया गया है। ***इसे न तो मोड़ें और न ही विकृत करें। दूसरा उत्तर-पत्र नहीं दिया जायेगा। केवल उत्तर-पत्र का ही मूल्यांकन किया जायेगा।***
4. अपना ***अनुक्रमांक तथा उत्तर-पत्र का क्रमांक प्रथम आवरण-पृष्ठ पर पेन से*** निर्धारित स्थान पर लिखें।
5. ***उत्तर-पत्र के प्रथम पृष्ठ पर पेन से अपना अनुक्रमांक निर्धारित स्थान पर लिखें तथा नीचे दिये वृत्तों को गाढ़ा कर दें। जहाँ-जहाँ आवश्यक हो वहाँ प्रश्न-पुस्तिका का क्रमांक तथा सेट का नम्बर उचित स्थानों पर लिखें।***
6. ओ० एम० आर० पत्र पर अनुक्रमांक संख्या, प्रश्न-पुस्तिका संख्या व सेट संख्या (यदि कोई हो) तथा प्रश्न-पुस्तिका पर अनुक्रमांक संख्या और ओ० एम० आर० पत्र संख्या की प्रविष्टियों में उपरिलेखन की अनुमति नहीं है।
7. उपर्युक्त प्रविष्टियों में कोई भी परिवर्तन कक्ष निरीक्षक द्वारा प्रमाणित होना चाहिये अन्यथा यह एक अनुचित साधन का प्रयोग माना जायेगा।
8. प्रश्न-पुस्तिका में प्रत्येक प्रश्न के चार वैकल्पिक उत्तर दिये गये हैं। ***प्रत्येक प्रश्न के वैकल्पिक उत्तर के लिये आपको उत्तर-पत्र की सम्बन्धित पंक्ति के सामने दिये गये वृत्त को उत्तर-पत्र के प्रथम पृष्ठ पर दिये गये निर्देशों के अनुसार पेन से गाढ़ा करना है।***
9. प्रत्येक प्रश्न के उत्तर के लिये केवल एक ही वृत्त को गाढ़ा करें। एक से अधिक वृत्तों को गाढ़ा करने पर अथवा एक वृत्त को अपूर्ण भरने पर वह उत्तर गलत माना जायेगा।
10. ***ध्यान दें कि एक बार स्याही द्वारा अंकित उत्तर बदला नहीं जा सकता है।*** यदि आप किसी प्रश्न का ***उत्तर नहीं देना चाहते हैं***, तो सम्बन्धित पंक्ति के सामने दिये गये सभी वृत्तों को खाली छोड़ दें। ऐसे प्रश्नों पर शून्य अंक दिये जायेंगे।
11. रफ कार्य के लिये इस पुस्तिका के मुखपृष्ठ के अंदर वाला पृष्ठ तथा अंतिम खाली पृष्ठ का प्रयोग करें।
12. परीक्षा के उपरान्त ***केवल ओ० एम० आर० उत्तर-पत्र*** ही परीक्षा भवन में जमा करें।
13. परीक्षा समाप्त होने से पहले परीक्षा भवन से बाहर जाने की अनुमति नहीं होगी।
14. यदि कोई अभ्यर्थी परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग करता है, तो वह विश्वविद्यालय द्वारा निर्धारित दंड का/की भागी होगा/होगी।

collegedunia.com
India's largest Student Review Platform